जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २६८ दिनांक :- २५/०९/२०२१

# वाहन चोरीचे ३ गुन्हे उघडकीस करुन १,४७,०००/- रुपये किंमतीचे मुद्देमालासह सराईत वाहन चोरास पकडण्यात काशिमीरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

दिनांक २०/०९/२०२१ रोजी काशिमीरा पोलीस ठाणेतील पोलीस गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि/महेंद्र भामरे व त्यांचे स्टाफ यांनी मिरा-भाईंदर परिसरात वाढलेल्या रिक्षा व बाईक चोरीच्या अनुषंगाने रेकॉर्डवरील आरोपी चेक करण्याची मोहीम चालु केली होती. नमुद मोहिमे दरम्यान पोलीस अमंलदार/२९३८ संतोष तायडे यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, संशईत शोएब अस्लम खान नावाचा वाहन चोर अमर पॅलेस सिग्नलजवळ सरोजा हॉटेल समोर रिक्षा मध्ये बसला आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने सपोनि/महेंद्र भामरे, सपोनि/ प्रशांत गांगुर्डे, पोउपनि/जावेद मुल्ला व त्यांच्या पथकाने सापळा रचून शोएब अस्लम खान, वय-२४ वर्षे, धंदा - बेकार, रा- पुनम गार्डन झोपडपट्टी, १५ नंबर बसस्टॉपजवळ, हटकेश, काशिमीरा, मिरारोड (पु), ता. जि-ठाणे यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे कौशल्याने तपास करुन काशिमीरा पोलीस स्टेशनचे ३ गुन्हे उघडकीस आणले आहेत. अटक आरोपीताकडून ५०,०००/- रुपये किंमतीची चोरीस गेलेली १ रिक्षा, ७५०००/- रुपये किमंतीची चोरीस गेलेली लाल रंगाची बजाज कंपनीची पल्सर २२० दुचाकी व २२०००/- रुपये किमंतीची चोरीस गेलेली लाल रंगाची पॅशन प्रो दुचाकी असे एकूण १,४७,०००/- रुपये किमंतीचे वाहनांसह अटक केली आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | काशिमीरा | गु.रजी.नं ६०९/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ |
| २. | काशिमीरा | गु.रजी.नं ५४१/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ |
| ३. | काशिमीरा | गु.रजी.नं ६०८/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री अमित काळे, पोलीस उपआयुक्त, परीमंडळ-०१ व श्री विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.निरी/श्री संजय हजारे, पोनि/श्री विजय पवार (गुन्हे), पोनि/श्री जितेंद्र पाटील (प्रशासन), स.पो.निरी/महेंद्र भामरे, स.पो.निरी/श्री प्रशांत गांगुर्डे, पो.उप.नि/जावेद मुल्ला, पो.ना/३०६२ सुरेश शिंदे, पोशि/२९३८ संतोष तायडे, पोशि/११६१ स्वप्निल मोहिले, पोशि/३६५७ शरद नलावडे, पोशि/३०७६ जयकुमार राठोड, पोशि/३००८ सुधीर खोत व पोशि/३३७० सचिन मोरे सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.